# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड** **दिनांक २९/०७/२०१८**

## १)घरफोडी :-

**भोकर :-** दिनांक २५.०७.२०१८ रोजी चे ०३.०० ते दि. २७.०७.२०१८ चे ०४.०० वा. चे दरम्यान फिर्यादीचे घरी भोकर जि. नांदेड येथे यातील फिर्यादी हा त्यांचे राहते घराला कुलूप कोंडा लावुन बाहेरगावी गेला असता कुणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचा कडी कोंडा कुलूप तोडुन घरात प्रवेश करुन घरातील कपाटामधील सोन्याचे दागीने व मोबाईल असा एकुण किंमती ६५,५००/-रु. चा माल चोरुन नेला. वगैर **फिर्यादी जगदीशचंद काशीराम भारद्वाज, वय ५९ वर्षे व्यवसाय मंजीद कॉटन भोकर** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. भोकर** गुरनं. २१८/२०१८ कलम ४५७, ३८० भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास सपोनि/भाले , मो.नं. ९५४५०४९९७७** हे करीत आहेत.

## २) चोरी

**उस्माननगर :-** दिनांक २३.०७.२०१८ चे ०९.३० वा. चे सुमारास मौजे पिंपळदरी शिवार ता. कंधार जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीने फिर्यादीचे शेतातील एल. टी. कंपणीचे स्टाटर व ५० फुट थ्री फेजचे वायर किंमती ३,५००/-रुपयाचे चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी माधव तुळशिराम भोंग, वय ३६ वर्षे व्यवसाय शेती रा. पिंपळदरी ता. लोहा** यांनी दिलेल्या तक्रारीवरुन **पो.स्टे. उस्माननगर** गुरनं. ११८/२०१८ कलम ३७९, ३४, भादवी प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/९०२ बोकारे, मो.क्र. ९५५२५५५७४१५** हे करीत आहेत.

## ३) फसवणुक :-

**देगलुर :-**दि. ०४.०६.२०१२ ते दि. ०९.०६.२०१२ व दि. १५.०६.२०१२ ते दि. २३.०६.२०१२ कालावधीत मौजे हनुमान हिप्परगा ता. देगलुर जि. नांदेड येथे यातील नमुद आरोपीतांनी संगणमत करुन महात्मागांधी रोजगार हमी योजना अंतर्गत रोपवाटीका काम करीत असतांना मजुरांचे हजेरी पत्रक क्रमांक ७२७५६ व १०७२४१ या हजेरी पत्रात एकुण ७९ मजुर असुन त्यात १२ मजुरांची खोटी नावे घालुन हजेरी पत्रक खोटे तयार करुन खोटे असल्याची माहीती असुन शासनास एकुण ११,८४०/-रुपयाचे भोगस हजेरीपत्रक सादर करुन फसवणुक करुन अपहार करण्याचा प्रयत्न केला. वगैरे वरुन **फिर्यादी संगमेश्वर मल्लीकार्जुन कानडे, वय ३९ वर्षे व्यवसाय नौकरी विस्तार अधिकारी प. सं. देगलुर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. देगलुर** गुरनं ३२५/२०१८ कलम ४२०, ४६५, ४६७, ४६८, ४७१, ५११, ३४ भादवी कायदया प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/मराडे, मो.क्रं. ९९२२११२३९३** हे करीत आहेत.

## ४) हयगयीने वाहान चालवुन मरणास कारणीभुत (अपघात) :-

**इतवारा :-** दिनांक २४.०७.२०१८ रोजी चे २३.०० वा. चे सुमारास बर्की चौक ते जुना गंज जाणारे रोडवर इतवारा नांदेड येथे यातील **मयत नामे मोहम्मद सिराज पि. मोहम्मद मखदुम रा. मन्यारगल्ली इतवारा** हा औषधी आनण्यासाठी मेडीकलवर नमुद ठिकाणी जात असताना यातील ॲटो क्रमांक एम. एच. २६/एन-३१४ च्या चालकाने आपले ताब्यातील वाहान हयगई व निष्काळजीपणाने भरधाव वेगात चालवुन यातील मयतास पाठीमागुन जोराची धडक देवुन गंभीर दु:खापत करुन त्याचे मरणास कारणीभुत झाला. वगैरे **फिर्यादी मोहम्मद मखदुम पि. मोहम्मद नकीसाब, वय ५० वर्षे व्यवसाय व्यापार रा. मन्यार गल्ली इतवारा नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पो.स्टे. इतवारा** गुरन २४१/२०१८ कलम ३०४ (अ), २७९, भादंवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोउपनि/ आर. बी. चौधरी , मो.नं. ७२४९२२९७२९** हे करीत आहेत.

# सकल मराठा अंदोलना बाबत दाखल गुन्हयाची माहीती :-

**अ) कुंटूर :-** दिनांक २७.०७.२०१८ रोजी चे १०.३० ते १३.०० वा. चे दरम्यान राहेर येथील गोदावरी नदीचे पुलाजवळ ता. नायगाव जि. नांदेड येथे, यातील नमुद आरोपीतांनी सकल मराठा मोर्चातील आंदोलन कर्त्यानी मराठा समाजाला आरक्षण द्या या मागणीसाठी जलसमाधी घेणेकामी नमुद ठिकाणी जमवुन जय भवानी जय शिवाजी, एक मराठा लाख मराठा अशी घोषणा करीत मा. जिल्हाधिकारी यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी पोकॉ/१००१ व्यकंट तुकाराम जाधव, पो. स्टे. कुंटूर** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. कुंटूर** गुरन ११७/२०१८ कलम १३५ मु. पो. का कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१५९२ निकम, मो.क्र. ९१५८९१११५९२** हे करीत आहेत.

**ब) कुंटूर :-** दिनांक २७.०७.२०१८ रोजी चे २०.१५ वा. चे सुमारास कहाळा खु. येथुन शंभर ते दोनसे मिटर अंतरावर ता. नायगाव जि. नांदेड येथे, यातील अज्ञात आरोपीतांनी सकल मराठा मोर्चातील आंदोलन कर्त्यानी मराठा समाजाला आरक्षण द्या या मागणीसाठी नमुद ठिकाणी नांदेड ते मुखेड जाणारी बस क्रमांक एम.एच. १४ बिटी १९९२ वर दगडफेक करुन काचा फोडुन ५,०००/-रुपयाचे शासकीय मालमत्तेचे नुकसान केले. बसमधील प्रवाशाना धोका निर्माण केला.. वगैरे **फिर्यादी संभाजी मारोती कोलमवाड, वय ४७ वर्षे व्यवसाय एस. टी. बसचालक बॅच क्रमांक १८५५२ मुखेड आगार** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. कुंटूर** गुरन ११६/२०१८ कलम ३३६, ४२७, भादवि कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/ भोळे, मो.क्र. ९४२०४०३५०९** हे करीत आहेत.

**क) उस्माननगर :-** दिनांक २८.०७.२०१८ रोजी चे १३.३० वा. चे सुमारास मौजे मारतळा ते वाका जाणारे रोडवर हातणी पाटीजवळ ता. लोहा जि. नांदेड येथे, यातील आरोपीतांनी संगणमत करुन सकल मराठा मोर्चातील आंदोलन कर्त्यानी मराठा समाजाला आरक्षण मिळावे या करीता गैरकायदयाची मंडळी एकत्र जमवुन बसचा रस्ता आडवुन बस क्रमांक एम. एच. -२०/बी. एल. २१७८ वर दगडफेक, लाकडाने काचा फोडुन पांढरे कॅनमधील रॉकेल टाकुन सदर बसला आग लावुन पेटवुन दिले. सदर बसचे अंदाजे १५,०००,००/-रुपयाचे शासकीय मालमत्तेचे नुकसान केले व सरकारी कामात अडथळा निर्माण करुन मा. जिल्हाधिकारी यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले . वगैरे **फिर्यादी शामसुंदर शंकरराव वाघमारे, वय ३७ वर्षे व्यवसाय बस चालक बॅच क्रमांक २२७२९ रा. आंबेडकर नगर देगलुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. उस्माननगर** गुरन ११७/२०१८ कलम ३५३, ३४१, ३३६, ४३५, १४३, १४७, १४८, १४९, ५०६, भादवी सह कलम ३, ४ सा. मा. नु. अधि. १९८४, १३५ मु. पो. का. व ७ क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/काथवटे, मो.क्र. ९६०४००२९८०** हे करीत आहेत.

**ड) अर्धापुर :-** दिनांक २८.०७.२०१८ रोजी चे १०.२० वा. चे सुमारास पिंपळगाव फाटा ते येळेगाव व कारखाना जाणारा रोड दिग्रस नांदला जवळ ता. अर्धापुर जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी हा त्याचे ताब्यातील प्राथमीक आरोग्यकेंद्र इस्लापुरची ॲब्युलंस जिप क्रमांक एम. एच. -२६/ आर २१३ जिपला आडवुन अज्ञात आरोपीतांनी सकल मराठा मोर्चातील आंदोलन कर्त्यानी गैरकायदयाची मंडळी जमवुन मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे अशी घोषणाबाजी करुन दगफेक करुन अँब्युलंसच्या काचा फोडुन रॉकेल टाकुन जाळुन शासकीय मालमत्तेचेअंदाजे ३,००,००० ते ४,००,०००/-रुपयाचे नुकसान केले मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी हानवता संभाजी मिरासे, वय ५८ वर्षे व्यवसाय नौकरी ॲब्युलंस चालक रा. ईस्लापुर ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. अर्धापुर** गुरन १६१/२०१८ कलम १४३, १४७, १४९, ३४१, ३३६, ४२७, ४३५, भादवी सह कलम ४ सा. मा. नुकसान अधि. १९८४ , १३५ मु.पो.का कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१५६६ कोकरे, मो.क्र. ९८२३७१४५६६** हे करीत आहेत.

**ई) अर्धापुर :-** दिनांक २८.०७.२०१८ रोजी चे १०.१५ वा. चे सुमारास  भोकर फाटा ते  आसना पुलादरम्यान ठिकठिकाणी ता. अर्धापुर जि. नांदेड येथे, यातील फिर्यादी हा  महामंडळाची बस क्रमांक एम. एच. -२०/बी. एल. ०८४३ भोकर येथुन नांदेडकडे घेवुन जात असताना नमुद ठिकाणी अनोळखी १० ते १५ सकल मराठा मोर्चातील आंदोलन कर्त्यानी गैरकायदयाची मंडळी जमवुन मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे अशी घोषणाबाजी करुन दगफेक करुन बसचा रस्ता आडवुन दगडफेक करुन सदर बसचे काचा फोडुन शासकीय मालमत्तेचेअंदाजे ७०,००० ते ८०,०००/-रुपयाचे नुकसान केले . भोकरफाटा ते आसना पुलादरम्यान ठिकठिकाणी खाजगी वाहने, एस. टी. बस , पोलीस जिप व इतर वाहानाचे काचा फोडुन नुकसाण केले. व मा. जिल्हाधिकारी साहेब यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन केले. वगैरे **फिर्यादी हानवता संभाजी मिरासे, वय ५८ वर्षे व्यवसाय नौकरी अॅब्युलंस चालक रा. ईस्लापुर ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन **पो.स्टे. अर्धापुर** गुरन १६०/२०१८ कलम १४३, १४७, १४९, ३४१, ३३६, ४२७, ४३५, भादवी सह कलम ४ सा. मा. नुकसान अधि. १९८४ , १३५ मु.पो.का कायद्याप्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/१५६६ कोकरे , मो.क्र. ९८२३७१४५६६** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधीक्षक कार्यालय,नांदेड
फोन नंबर ०२४६२-२४४४७४